**अपंग व्यक्ती (समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण) अधिनियम १९९५ नुसार वित्त विभागाच्या अधिपत्याखालील लेखा व कोषागारे संचालनालयाअंतर्गत गट-क व गट-ड या संवर्गातील पदे शारिरीकदृष्ट्या अपंग उमेदवारांकरीता आरक्षण ठेवणे.**

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन निर्णय क्रमांक संलेको २००९/ प्र. क्र.१३० / कोषा. प्र-३
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २ फेब्रुवारी, २०११.

संदर्भ :- १) अपंग व्यक्ती (समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्कांचे सरक्षण) अधिनियम १९९५(क्र.१/१९९६)
२) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही १०९८/प्र.क्र.१२/१६-अ, दिनांक २ मे, १९९८
३) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक संकीर्ण ११९८/प्र.क्र.९८/कोषागारे-३,दिनांक ७ जानेवारी, १९९९.
४) शासन निर्णय, वित्त विभाग, संकीर्ण ११.०२/प्र.क्र.३४/२००२/कोषा.प्र.३, दिनांक १९ मे, २००४.
५) शासन निर्णय, वित्त विभाग, संकीर्ण ११.०२/प्र.क्र.३४/२००२/कोषा.प्र.३, दिनांक २७ फेब्रुवारी, २००९.
६) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक न्यायाप्र २००९/प्र.क्र.५/सुधार-३, दिनांक ३ ऑगष्ट, २०१०

**प्रस्तावना** :- केंद्र शासनाने अपंग व्यक्ती (समान संधी हक्कांचे संरक्षण व संपूर्ण सहभाग) अधिनियम, १९९५ मधील तरतुदीस अनुसरुन त्यांच्या अखत्यारितील आस्थापनेवरील अपंग व्यक्तींसाठी पदे निश्चित करुन त्यांची यादी प्रसिध्द केली आहे. सदर यादीनुसार राज्य शासनाच्या अखत्यारितील शासकीय व निमशासकीय आस्थापनेवरील जी पदे समा आहेत ती पदे मंत्रालयीन विभागांनी अपंगांसाठी निश्चित करावीत व तसे आदेश निर्गमित करुन त्याप्रमाणे अपंगांची पदे भरण्याबाबतची कार्यवाही करण्याबाबत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने संदर्भाधीन क्रमांक १ येथील दिनांक ०३/०८/२०१० च्या शासन निर्णयान्वये दिलेले आहेत. त्यानुसार वित्त विभागाच्या अधिपत्याखालील लेखा व कोषागारे संचालनालयाअंतर्गत गट-क व गट-ड या संवर्गातील पदे शाारिरीकदृष्ट्या अपंग उमेदवारांकरीता निश्चित करण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय** :- वित्त विभागाच्या अधिपत्याखालील लेखा व कोषागारे संचालनालया अंतर्गत गट-क व गट-ड या संवर्गातील खालील पदे शारिरीकदृष्ट्या अपंगत्वाचे किमान ४०% प्रमाणे असलेल्या अपंग व्यक्तीकरिता सुनिश्चित करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | पदनाम | अंध/अल्पदृष्टी | कर्णबधीर | अस्थिव्यंग |
|---|---|---|---|---|
| सहाय्यक अधिक्षक/ सहाय्यक भांडार निरीक्षक, निवड श्रेणी लिपिक/उपलेखापाल, टिप्पणी सहाय्यक/संग्रह पडताळक/वरिष्ठ लिपिक/रोखपाल/उच्चस्तर लिपिक, कनिष्ठ लिपिक/लिपिक टंकलेखक अस्तंगत होणारे | | | | |
| १. | सहाय्यक अधिक्षक/ सहाय्यक भांडार निरीक्षक (संचालनालय लेखा व कोषागारे), निवड श्रेणी लिपिक (अधिदान व लेखा कार्यालय) उपलेखापाल (कोषागार कार्यालय), सहाय्यक लेखा अधिकारी. | अपात्र | पात्र HH | पात्र BL,OA,OL |
| २. | टिप्पणी सहाय्यक/संग्रह पडताळक/वरिष्ठ लिपिक/रोखपाल (संचालनालय लेखा व कोषागारे), उच्चस्तर लिपिक (अधिदान व | अपात्र | पात्र HH | पात्र BL,OA,OL |

| अ.क्र. | पदनाम | अंध/अल्पदृष्टी | कर्णबधीर | अस्थिव्यंग |
|---|---|---|---|---|
| ३. | कनिष्ठ लिपिक/लिपिक टंकलेखक संवर्ग | अपात्र | पात्र<br>HH | पात्र<br>BL,OA,OL |
| ४. | गट-ड | अपात्र | पात्र<br>HH | पात्र<br>OA,OL |
| शासन अधिसूचना वित्त विभाग दि.०२.१२.२००८ अन्वये लेखा व कोषागारे गट क सेवेमधील वरिष्ठ लेखापाल कनिष्ठ लेखापाल संवर्ग | | | | |
| ५. | वरिष्ठ लेखापाल | अपात्र | पात्र<br>HH | पात्र<br>BL,OA,OL |
| ६. | कनिष्ठ लेखापाल | अपात्र | पात्र<br>HH | पात्र<br>BL,OA,OL |
| HH=Hearing Handicapped, OL=One Leg Affected, OA=One Arm Affected, BL=Both Leg Affected | | | | |

२. उपरोक्त पदांसाठी अपंग व्यक्तींकरिता निश्चित करण्यात आलेल्या आरक्षणासंबंधी सध्या अस्तित्वात असलेले सर्व आदेश/शासन निर्णय अधिक्रमित करण्यात येत आहे.

३. गट "क" मधील "वाहनचालक" या पदाची कर्तव्ये व जबाबदारी लक्षात घेता, "वाहनचालक" या पदास अपंग प्रवर्गाचे आरक्षण लागू करण्यापासून सूट देण्यात येत आहे.

४. हा शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक न्यायाप्र २००९/प्र.क्र.५/सुधार-३, दिनांक ३ ऑगष्ट, २०१० अन्वये दिलेल्या निर्देशानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०११०२०२१९२६३३००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( स. ह. भोसले )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
मा. राज्यपालांचे सचिव,
मा. मुख्यमंत्री यांचे सचिव,
मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव,
मा. मुख्य सचिवांचे उप सचिव,
सर्व मा.मंत्री/राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक,
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राने),
निबंधक, लोक आयुक्त व उपलोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई (पत्राने),
निबंधक, उच्च न्यायालय, (अपीलेट साईड), मुंबई (पत्राने),
प्रोपोनेटरी ॲण्ड सिनिअर मास्टर उच्च न्यायालय, मुंबई (पत्राने),
महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), मुंबई,
महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), नागपूर,
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
सेवायोजन संचालनलाय, मुंबई,
मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी कोकण भवन, नवी मुंबई,
सर्व विभागीय सह संचालक, लेखा व कोषागारे,
सर्व विभागीय उपमुख्य लेखा परिक्षक(वरिष्ठ), स्थानिक निधी लेखा कार्यालये,
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई,
सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
सर्व मंत्रालयीन विभाग,
[illegible]